नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 24/12/2021 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 10/09/2020 चे 17.12 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. 354/2020 कलम 354, 323, 506 भादवी सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 10/09/2020 चे 08.30 वा. ते 08.40 वा. दरम्यान 17 वर्षीय पिडीत/फिर्यादी ही खदानाचे पान्यात कपडे धुण्याकरीता व अंघोडी करीता गेली असता आरोपी नामे – खीलेश बिजेंद्र शाहु, वय 20 वर्ष, रा. निमजी खदान कळमेश्वर याने पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 14/12/2020 रोजी अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन महिला सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती रासकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 24/12/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. ओ. पी. जैस्वाल, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 323, 506 भादंवि. मध्ये 1 वर्ष सक्षम कारावास व 1,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधा कारावास, कलम 8 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यामध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 1,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधी शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. रश्मी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. किशोरकुमार वैरागडे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री भवानीप्रसाद मिश्रा, श्री. प्रमोद कडबे व पोहवा श्री. मनोज तिवारी यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर